1) **Missing / Kidnapped Children**

2) Wavi Police Station

3) 08/12/2014 to 21/01/2015

**Brief Facts** :

Girl named Deepali Sitaram Rahane, age-17, R/o Pathare, Taluka Sinnar, District Nashik went missing on date-06/2/2014. Parents registered missing complaint on 18/02/2014 at Wavi Police Station. Later, an offence vide C.R.No.168/2015 u/s 363, 366 IPC was registered on 08/12/2015. Parents of the girl were desperately in search of their missing girl.

Investigation of this case was then transferred to Anti-Human Trafficking Unit. API Fula and his team worked hard to detect the said offence. He interrogated all the witnesses and analysed mobile data. After thorough investigation, API Fula narrowed down on the suspect named Anna Eknath Gunjal. When police raided farm house of the accused, they found him absconding. Then API Fula got information that accused was hiding in a farmhouse at village Karanjgaon in Ahmednagar district. Police raided the above place and found accused person with the kidnapped girl. Accused was arrested and it was revealed during investigation that accused had built a small room on the first floor of his farm house in which he kept the girl locked whole time. Accused had forced Deepali to write a letter to her parents stating that she was willingly leaving her house & will return after she is 18 yrs of age.

# मुलीस कोंडून ठेवणारा भोंदूबाबा गजाआड

## तब्बल अकरा महिन्यांनंतर बाबा पोलिसांच्या जाळ्यात, मुलीचीही सुटका

वावी, दि. २१ (प्रतिनिधी)- अकरा महिन्यापूर्वी रोख पैसे व दागिन्यांसह पळून गेलेल्या अल्पवयीन मुलीचा ११ महिन्यानंतर शोध लावण्यात नाशिक ग्रामीण पोलिसांना यश आले असून या भागातील एका भोंदू बाबानेच तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेऊन तिला डांबवून ठेवल्याचे उघड झाले आहे. मुखी राम बगलमे छुरी अशा प्रवृत्तीचा अण्णा एकनाथ गुंजाळ हा बाबा गजाआड गेला आहे. रामायण सांगणाऱ्या या बाबाच्या या महाभारताची चांगलीच चर्चा पंचक्रोशीत सुरू आहे.

पाथरे येथील १६ वर्षीय शालेय विद्यार्थिनी ६ फेब्रुवारी २०१४ रोजी घराबाहेर घरातील पंधरा हजार रुपयांची रोकड आणि आपल्या आईच्या तीन तोळे सोने घेऊन पळून गेली होती. तिने आपल्या हस्ताक्षरात चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यात मी स्वतःच्या मर्जीने घरातून निघून जात असून, सज्ञान झाल्यानंतर पुन्हा घरी परतेल, असे नमूद केले होते. त्यामुळे कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. पण तिचा तपास न लागल्याने कुटुंबियांनी अखेर पोलिसांत मिसिंग दाखल केली. पोलिसांना तपासात यश येत नसल्याने अखेर नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संजय मोहिते यांनी हा तपास अॅन्टी ह्यूमन ट्रॉफिकिंग युनिटकडे सोपविला. युनिटचे सहाय्यक निरीक्षक आर. पी. फुल्ला, हेमंत पाटील, एस. आर. दोंदे, एस. के. भोये, एम. एस. थेटे आदींच्या पथकाने तपास हाती घेऊन खबऱ्यांच्या माध्यमातून चक्रे फिरविली असता परिसरात कीर्तनाच्या माध्यमातून रामायणाची जनजागृती करणाऱ्या भोंदूबाबाचा प्रताप समोर आला.

मूळचा पाथरे गावातीलच या बाबानेच तिला लग्नाचे आमिष दाखवून व चिठ्ठी लिहिण्यास सांगून पळवून नेल्याचे पुढे आले. त्याने या मुलीस घेऊन प्रथम पुणे येथे काही दिवस वास्तव्य केले. त्यानंतर त्याने मूळ गाव गाठून पाथरे ते जऊळके मार्गावरील स्वतःच्या गुंजाळ वस्तीतील दुमजली घरात तिला डांबून ठेवले. दिवसभर धार्मिक कार्यक्रम करून तो मध्यरात्री आपल्या वस्तीवर ठेवलेल्या मुलीस भेटत असे. या काळात मुलीस घराबाहेर पडण्यास मज्जाव करण्यात आला होता, तसेच जर मुलीस फिरण्याची इच्छा झाल्यास तो मध्यरात्री स्विफ्ट डिझायर (एमएच १५ ईडी २६३६) या आपल्या कारमधून घेऊन फिरत असे आणि पहाटे पुन्हा तिला घरात डांबून ठेवत असे. या घटनेची माहिती गुप्त खबऱ्याकडून पोलिसांना मिळाली होती. मात्र, पोलीस पोहोचण्यापूर्वीच बाबाने मुलीसह पोबारा केला होता. पोलिसांनी पाठपुरावा सुरूच ठेवल्याने अखेर भोंदूबाबा पोलिसांच्या हाती सापडला आणि गजाआड झाला.

दरम्यान या मुलीचीही सुखरूप सुटका करण्यात आली आहे. पोलिसांची चाहुल लागताच बाबा राहुरी तालुक्यातील कारंजगाव येथे आपल्या मावशीच्या घरात मुलीसह दडून बसला होता. मोबाइल टॅपिंगमुळे तो पोलिसांच्या हाती लागला असून, अॅन्टी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिटने त्याच्या आज कारंजगाव येथे मुसक्या आवळल्या. याप्रकरणी वावी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार एस. पी. माळी करीत आहेत.

पुण्य नगरी २२।१।२०१५

# कीर्तनकाराच्या अंधारकोठडीतून मुलीची सुटका

सकाळ वृत्तसेवा दि.22/1/15



अण्णा गुंजाळ

वावी, ता. २१ : पाथरे येथील कीर्तनकाराने डांबून ठेवलेल्या अल्पवयीन मुलीची पोलिसांनी आज अंधारकोठडीतून सुटका केली. एक वर्षापासून अल्पवयीन मुलीला आपल्याच घरात डांबून ठेवणारा कीर्तनकार अण्णा एकनाथ गुंजाळ (वय २७, रा. पाथरे, ता. सिन्नर) याला वावी पोलिसांनी मुलीसह ताब्यात घेतले आहे.

अण्णा याने पाथरे येथील एका सोळावर्षीय मुलीस एक वर्षापूर्वी फूस लावून जाळ्यात अडकविले. त्याने या मुलीला मागील

पान ८ वर ▶

# अंधारकोठडीतून मुलीची सुटका

▶ पान १ वरून

वर्षी ६ फेब्रुवारीला स्वहस्ताक्षरात वडिलांच्या नावे चिठ्ठी लिहून ठेवण्यास सांगितले. 'मी स्वखुशीने घर सोडून जात आहे. अठरा वर्षांची पूर्ण झाल्यावर परत येईल. कोणीही माझा शोध घेऊ नये', असे चिठ्ठीत लिहिलेले होते. पळून जाताना ही मुलगी आपल्या आईची तीन तोळ्याची सोन्याची पोत घेऊन गेली होती.

अण्णासाहेब याने तिला काही दिवस पुणे येथे ठेवले. त्यानंतर त्याने आपल्या मळ्यातील राहत्या घरी वरच्या मजल्यावर एक छोटी खोली बांधली. त्यात केवळ एक पलंग मावेल एवढी जागा होती. तसेच, वर खोलीत जाण्यासाठी कोणताही जिना ठेवला नाही. त्याने आपली पहिली पत्नी, आई-वडील व गावातील लोकांना याचा सुगावा लागू दिला नाही. ती मुलगी दिवसभर त्याच खोलीत राहत असे. त्या खोलीत सर्व काही जीवनावश्यक वस्तू, खाद्य पदार्थ व गरजेच्या वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. त्या मुलीला बाहेर पडण्याची इच्छा झाल्यास रात्री आपल्या स्विफ्ट डिझायर (एमएच १५, इपी २६३६) गाडीत फिरवून आणत असे व पहाटे पुन्हा त्या खोलीत आणून सोडत असे. बेपत्ता मुलीची केस नाशिक येथील मानवी वाहतूक कक्षाकडे वर्ग करण्यात आली होती. वावी येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, नाशिक येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक आर. बी. फुला यांना या मुलीबद्दल गुप्त माहिती मिळाली. त्यांनी पोलिस उपनिरीक्षक एस. सी. बस्ते, हवालदार के. यू. धेंडे, एस. आर. दोंदे, शिवाजी माळी, महिला पोलिस एस. के. भोये, एम. एस. थेटे यांच्या मदतीने आरोपीच्या घरी छापा टाकला. परंतु, अण्णासाहेब यास अगोदरच सुगावा लागल्याने तो मुलीसह आपल्या मावशीकडे करंजगाव (ता. राहुरी, जि. नगर) येथे पळून गेला. पोलिसांनी त्याचा शोध घेत त्याला करंजगाव येथून पीडित मुलीसह ताब्यात घेतले. वावी पोलिसांनी दोघांना वावी पोलिस ठाण्यात आणले. त्या वेळी पीडित मुलीचे मानसिक स्वास्थ बिघडल्याने तिला नाशिक येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध वावी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दि. २२/१/१५
सकाळ

# पाथरेतील रामायणाचार्यांची कृष्णलीला

## विवाहित असतानाही पळविले अल्पवयीन मुलीला; करंजगावातून घेतले ताब्यात

। वावी । वार्ताहर ।

[illegible]र्तन, प्रवचनातून भाविकांना रामायणाचे पाठ देणाऱ्या रामायणाचार्याने स्वतः विवाहीत असतानाही एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत तब्बल वर्षभर एका छोट्याशा खोलीत डांबून ठेवल्याचा खळबळजनक प्रकार तालुक्यातील पाथरे येथे उघडकीस आला असून रामायणाचार्याच्या या कृष्णलिलेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, तथाकथित रामायणाचार्याला मुलीसह राहुरी तालुक्यातील करंजगाव येथील त्याच्या मावशीच्या घरातून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील पाथरे येथे स्व[illegible]चा रामायणाचार्य म्हणविणारा ह.[illegible] आण्णासाहेब एकनाथ गुंजाळ (२७) वास्तव्यास असून पिडीत मुलगी त्याच्या वस्तीजवळच वास्तव्यास असून पाथरे हायस्कूलमध्ये शिकत होती. आण्णा गुंजाळ याचे पिडीत मुलीच्या घरी पोथी वाचण्याच्या निमित्ताने जाणे-येणे असल्याने त्याचा गैरफायदा घेऊन त्याने पिडीत मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला मोठ-मोठी स्वप्न तसेच लग्नाचे आमिष दाखवून दि. १४ फेब्रुवारी २०१४ रोजी पळवून नेले होते. पिडीत मुलीने आण्णा गुंजाळ याच्यासोबत जाताना सोबत १५ हजारांची रोकड व आईची तीन तोळे वजनाची सोन्याची पोतही घेऊन गेली. तसेच 'मी घर सोडून जात आहे, १८ वर्षांची झाल्यानंतर परत येईन' अशा आशयाची वडिलांच्या नावाने चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यावेळी पिडीत मुलगी १६ वर्षांची होती. आण्णा गुंजाळ याने मित्रांच्या मदतीने पिडीत मुलीला पुणे येथे घेऊन जात तेथे ६ दिवस वास्तव्य केले. तोपर्यंत आईवडीलांनी मुलगी बेपत्ता झाल्याची फिर्याद वावी पोलिसांना दिली होती. त्यामुळे वावी पोलिस मुलीचा शोध घेत होते परंतु शोध लागत नव्हता. सहा दिवसांनंतर अण्णा गुंजाळ याने सदरहू मुलीला आपल्या जऊळके रस्त्यावरील वस्तीवर आणले व घराच्या वरच्या मजल्यावर असलेल्या छोट्याशा खोलीत ठेवले.




पोलिस मुलीचा शोध घेत असल्याने पिडीत मुलीला खोलीच्या बाहेर येऊ देत नसे, तसेच घरातील व जवळपासच्या नागरिकांना संशय येऊ नये याची तो पुरेपुर काळजी घेत होता. मुलीला फिरण्याची इच्छा झाल्यास रात्रीच्या वेळी स्वतःच्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये बसवून (क्र. एम.एच.१५, ई.डी.-२६३६) फिरायला घेऊन जात असे, रात्रभर फिरवून पुन्हा पहाटे उजाडायच्या आत मुलीला खोलीत आणून ठेवत असे. असा सिलसिला जवळजवळ वर्षभर सुरु होता. १० महिन्यांचा कालावधी उलटूनही गुन्ह्याचा तपास लागत नसल्याने नाशिक ग्रामीणचे पोलिस अधिक्षकांनी सदरहू गुन्ह्याचा तपास ॲन्टी ह्युमन टॉफिकींग युनिट, नाशिक यांच्याकडे सोपविला. त्यानंतर युनिट मधील सहाय्यक पोलिस निरीक्षक आर. पी. फुल्ला, वावीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, एस. के. भोये, एम. एस. थेटे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यास सुरुवात केली.

दरम्यान पिडीत मुलीच्या आईवडीलांना आण्णा गुंजाळ याच्यावर संशय होताच तथापि गेल्या काही दिवसांत त्याच्या हालचाली आणखीच संशयास्पद वाटू लागल्याने त्यांनी पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. पोलिसांनी गुप्त खबऱ्यामार्फत तपास केला असता आण्णा गुंजाळ याने पिडीत मुलीला त्याच्या वस्तीवरील वरच्या खोलीत डांबून ठेवले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरु केल्याची कुणकुण गुंजाळ यास लागताच त्याने पिडीत मुलीसह पळ काढला. राहुरी तालुक्यातील करंजगाव येथे असलेल्या मावशीकडे त्यांनी आश्रय घेत तेथे राहू लागले. त्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी करंजगाव येथे जाऊन आण्णा गुंजाळच्या मावशीच्या घरातून पिडीत मुलीसह गुंजाळ यास काल (दि.२१) ताब्यात घेतले. वावी पोलिसांत दाखल असलेल्या गुन्हाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार एस. पी. माळी करत आहेत.

गावकरी २२।१।२०१५